# पुस्तकांचा अवघा संग्रह कायम अपुल्या संगतीला

लेखन-साहित्य आता पुस्तक-छपाई वा घरातल्या ग्रंथालयातल्या कपाटापुरतीच मर्यादित राहिली नाहीत. ती आधुनिक तंत्रज्ञानानेही आपली केली आहेत. 'ई-बुक'चं हे विश्व स्वस्त-मस्त आणि अफाट पुस्तकसंग्रहाने भरलेलं आहे. चंद्रपूरच्या अ.भा.साहित्य संमेलनानिमित्ताने या आधुनिक पुस्तकसंग्रहाच्या तंत्रज्ञान आणि व्यवहाराचा माहिती रिपोर्ट.

■ स्वाती माळी

ज्याच्या घरी नाही पुस्तकाचं कपाट, तो अकलेने सपाट! ही जुनी म्हण खरी असली तरी पुस्तकसंग्रहाप्रमाणेच त्याच्या कपाटासाठी घरात जागा उपलब्ध करणं, ही आर्थिकच नव्हे, तर अनेक दृष्टीने अडचणीची बाब झाली आहे. पण आता काळजी नको! त्यावर आता उपाय निर्माण झाला आहे तो म्हणजे- ई-पुस्तकं किंवा मोबाइल-पुस्तकं! छापील, बांधीव पुस्तकांसाठी कपाट वा सोबतीचे 'ओझे' वाहण्याचा खटाटोप करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाने उपलब्ध करून दिलेली पुस्तकं. खऱ्या अर्थाने पुस्तकं ही जगण्याचा साथीदार ठरत आहेत. सध्या अशी काही ई-पुस्तकं आणि मोबाइल पुस्तकं आता मराठी वाचकांच्या विश्वात अवतरली आहेत. शेकडो-हजारो पुस्तकांचं अवघं कपाटच या तंत्रज्ञानामुळे हातात आलं आहे. पण हे कपाट उघडण्यापूर्वी त्यामागचं साधं-सोपं तंत्रज्ञान समजून घ्यायला हवं.

*ई-बुकचे इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले* आणि *नॉन इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले* असे दोन प्रकार आहेत. *इलेक्ट्रॉनिक डिस्प्लेमध्ये* पुस्तक अथवा वर्तमानपत्र नेहमीच्या रूपात पण डिजिटाईज्ड प्रकारात दिसतं. *नॉन इलेक्ट्रॉनिक डिस्प्लेमध्ये* त्यासोबत ध्वनी, चित्रफिती, छायाचित्रं असं बरंचसं काही पाहाता येतं. *ॲमेझॉनने किंडल* या उपकरणाद्वारे इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले *फॉरमॅटमध्ये*

